# वसाहतकालीन स्त्रीसुधारणाविषयक कायद्यांचा तौलनिक अभ्यास .

**प्रणाली प्रकाश पोवार**
इतिहास विभाग
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
powarpranali3@gmail.com

**घोषवारा :**

डॉ. आंबेडकर म्हणतात, "स्त्री जात समाजाचा अलंकार आहे. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे." परंतु भारतामध्ये प्राचीन काळापासून स्त्रियांना सामाजिक, राजकीय व कौटुंबिक जीवनात कमी महत्त्व दिले गेले. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे या दृष्टीकोनातून समाज स्त्रियांना बघत होता. राजकुळांतील स्त्रियांचा दर्जा सर्व सामान्य स्त्रियांपेक्षा थोडासा उच्च स्वरुपाचा होता. परंतु तरीही समाजाने तिच्यावर पडदा प्रथा,बालविवाह, सती प्रथा या व यासारख्या अनेक प्रथांद्वारे तिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. ब्रिटीश काळात स्त्री मुक्तीच्या चळवळी निर्माण झाल्या. प्रस्तुत शोधनिबंधातून ब्रिटिशकालीन म्हणजेच वसाहतकालीन स्त्री सुधारणा विषयक कायद्यांचा तोलनिक अभ्यास केला जाणार आहे.

**कळीचे शब्द :** पडदा प्रथा, बालविवाह, सती प्रथा, स्त्री मुक्ती चळवळी...

**प्रस्तावना:**

प्राचीन व मध्ययुगीन काळात स्त्रियांचा एकूण दर्जा खालावलेलाच होता. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाच्या उतरणीची सुरुवात उत्तर वैदिक काळापासून झाली. आजवरचा इतिहास हा पुरूषकेंद्री आहे. सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे प्रचंड योगदान असूनही त्याची दखल पुरूषकेंद्री इतिहासाने घेतली नाही. ब्रिटिशांच्या भारतातील आगमनाबरोबरच ब्रिटिशांच्या पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार भारतात झाला. या ब्रिटिश शिक्षणाचा अभ्यास करून बुद्धिजीवी मध्यमवर्ग निर्माण झाला. ज्यातून सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये स्त्रीमुक्तीचा विचार करता पुढील कायदे ब्रिटिश वसाहतकाळात झाले.

**वसाहतकालीन स्त्रीसुधारणाविषयक कायदे पुढीलप्रमाणे -**

**१) बालहत्या प्रतिबंधाचा पहिला कायदा (१८०२) :**

कोणताही दोष नसताना दूध पिणारे बालक नदीत किंवा देवीच्या पुढे कापून त्याची हत्या करण्याची प्रथा याकाळात प्रचलित होती. त्यामुळे अशा मुलांच्या संरक्षणासाठी 'बालहत्या प्रतिबंधक पहिला कायदा' अस्तित्वात आला. ब्रिटिशांनी इ. स. १८०२ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक कायदा' पास केला. ब्रिटिशांनी पास केलेला हा पहिलाच कायदा होय. बंगालमध्ये ही क्रुर प्रथा पाहून ब्रिटिश अधिकाऱ्यांना धक्काच बसला व या प्रथेविरूध्द त्यांनी कायदेशीर पाऊल उचलले.

**२) सतीबंदीचा कायदा ( १८२९ ) :**

सती पध्दत म्हणजे पती निधनानंतर त्याच्यां पत्नीने स्वत:ला जाळून घेणे किंवा चितेत उडी टाकणे. पती निधनानंतर पत्नीला अतिशय खडतर जीवन जगावे लागत असे. त्यामुळे तिला सती जाण्यास भाग पाडले जाई. ती चितेंतून बाहेर येऊ नये म्हणून लोक बांबू घेऊन चितेभोवती उभे राहत. तिच्या किंकाळया व ओरडण्याचा आक्रोश ऐकू येऊ नये म्हणून वाद्ये वाजविली जात असत. सतीबंदी विरोधी कायद्यास सनातनी लोकांनी प्रचंड विरोध केला. इ. स. 1815 ते 1818 या 4 वर्षांत 2266 स्त्रिया सती गेल्या होत्या व त्यापैकी 1885 स्त्रिया कलकत्ता विभागात सती गेल्या होत्या. 1812 पासून राजा राममोहन रॉय यांनी प्रयत्न केल्याने 4 डिसेंबर 1829 रोजी सती बंदीचा कायदा मंजूर झाला. ब्रिटीशांनी 1830 मध्ये मुंबई, मद्रास व कलकत्ता प्रांताला हा कायदा लागू केला.

**3) विधवा पुनर्विवाह कायदा (1856) :**

पती-पत्नींचे वैवाहिक जीवन दोघांपैकी एकाच्या मृत्यूमुळे संपुष्टात येते,आणि यामध्ये ज्या स्त्रीचा पती निधन पावतो, तिला 'विधवा' असे संबोधले जाते. समाजातील व्यभिचार कमी करण्यासाठी स्त्री- पुरूष समानतेच्या दृष्टिकोनातून विधवेने पुनर्विवाह केल्यास तो कायदेशीर ठरेल असा कायदा करावा अशी मागणी बाळशास्त्री जांभेकर यांनी केली होती. इ. स. 1856 मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला तरी प्रत्यक्षात विधवांचे पुनर्विवाह फारसे झाले नाहीत. 1856 नंतरच्या 40 वर्षांत संपूर्ण देशात फक्त 500 विधवांचेच पुनर्विवाह झाले.

**4) बालविवाह प्रतिबंधक कायदा (1872) :**

मुलगी किंवा मुलगा वयात येण्यापूर्वीचा विवाह म्हणजे बालविवाह होय. वेदकाळात बालविवाहाचे उल्लेख आढळत नाहीत. धर्मसूत्रांच्या काळापासून मात्र ते दिसून येतात. स्वातंत्र्यापूर्वी विवाहासाठी मुलींना 14 व मुलांसाठी 18 ही वयोमर्यादा होती. त्यानंतर 1949 मध्ये मुलीसाठी वयोमर्यादा 15 करण्यात आली. 19७८ मध्ये त्या कलमात दुरुस्ती करण्यात आली. 21 वर्ष मुलांसाठी व 18 मुलींसाठी लग्नाची वयोमर्यादा कायद्याने निश्चित करण्यात आली. कायद्याचा भंग केल्यास तरुणास 3 महिने सक्तमजुरी व 1000 रूपये दंड अशी शिक्षा होती. पोलिसांना अशा विवाहाची माहिती मिळताच पोलिस संबंधित व्यक्तींना अटक करू शकतात.

**5) विवाह नोंदणी कायदा ( 1874- 1954) :**

इ. स. 1872 मध्ये Special Marriage Act पास झाला. जात, धर्म, वंश, असा भेद न करता सर्व भारतीयांना विवाहाची नोंदणी करण्याची सुविधा प्राप्त झाली. 19 व्या शतकातील हा कायदा क्रांतिकारक मानला जातो. हिंदू व मुस्लिम पुरुषाला पहिली बायको जिवंत असताना दुसरा विवाह करता येत नाही. 1974 मध्ये 1872 च्या कायद्यात काही सुधारणा करुन नवा कायदा अस्तित्वात आला. वधू-वर हे नोंदणी विवाह करून आपल्या इच्छेनुसार धार्मिक विवाह समारंभ करू शकतात. विवाहाच्या अगोदर 1 महिना नोटीस द्यावी लागते. हा कायदा सर्व भारतीयांना विवाहाची संधी पध्दत उपलब्ध करुन देतो.

**निष्कर्ष :**

सर्व जगभर स्त्री विषयक ज्ञान शाखेचा अभ्यास व चर्चा सुरु आहे. स्त्रिविषयीच्या या अभ्यासातील चर्चेत प्रामुख्याने कन्या, पत्नी, माता, भगिनी इत्यादी भूमिकांतून स्त्रियांचे समाजातील स्थान, समस्या, आरोग्य शिक्षण या सर्वाचा अंतर्भाव होतो. जगातील सर्व संस्कृतीने स्त्रियांना दुय्यमत्व दिले. स्त्रियांचा विचार करणाऱ्या सर्व सिध्दांतांनी स्त्रियांच्या समान हक्काची मांडणी केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून वसाहतकालीन भारतातील स्त्रीविषयक कायद्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ साहित्य :**


1. खाडिलकर उषा (१९९९), स्त्रीमुक्ती कुतुहूल, वसंत बुक स्टॉल , मुंबई.
2. खिवसरा सारा मंगला (२००५), स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा संदर्भ , स्वरूप प्रकाशन , औरंगाबाद.
3. संगवे विलास (1979), *भारतातील सामाजिक समस्या,* पॉप्युलर प्रकाशन,
4. नंदकुमार भारंबे (2012), *मानवी हक्क,* निराली प्रकाशन, पुणे.
5. डॉ.एस.एस.गाठाळ - भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन.
6. नीलम गोऱ्हे ( संपा) - नव्या शतकातील महिला धोरणे व अंमलबजावणी.